




दैनिक महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक

# वादळ वार्ता

VADAL VARTA








vadalvartanews@gmail.com

●मुख्य संपादक : अजय भांगे ●संपादक : रमेश गुळभिले ●कार्यकारी संपादक : संतोष निकम मो.न. ९४२२६६००७७

● बीड/महाराष्ट्र ● रवीवार ३१ मार्च २०२४ ● आरएनआय/टिसी/एमएएचएमएआर/२०२३/५२३१५ ● वर्ष १ ले ● अंक २२७ ● पाने ४ ● किंमत ४ रुपये


# लोकसभा निवडणुकीत अपक्ष उमेदवार देणार नाही कोणाला पाडायचे ते पाडा मनोज जरांगे पाटील

## लोकसभा नाही पण विधानसभा निवडणुकीसाठी तयारी करत असल्याचं देखील त्यांनी म्हटले आहे



**दैनिक वादळ वार्ता**
**अंतरवालीसराठी प्रतिनिधी**
मनोज जरांगे पाटलांनी स्पष्ट केलंय की, लोकसभा निवडणुकीत अपक्ष उमेदवार देणार नाही. 30 मार्चला भूमिका स्पष्ट करणार असल्याचं जरांगे म्हणाले होते. त्यानुसार मराठा समाजाला पराभूत होऊ द्यायचं नाही. त्यामुळं अपक्ष उमेदवार देणार नसल्याचं जरांगे म्हणाले आहेत. 2 दिवसांआधीच प्रकाश आंबेडकर यांनी जरांगेंची भेट घेतली होती आणि त्यांनी 30 मार्च नंतर नवं राजकीय समीकरण समोर येईल असं म्हटलं होतं. मात्र आपण कोणालाही पाठींबा देणार नाही हे स्पष्ट करतानाच वंचितलाही पाठींबा नसेल हेही जरांगेंनी जाहीर केलंय.

मराठा आरक्षणाच्या आंदोलनामुळं जरांगेंच्या पाठीशी मोठ्या संख्येनं समाज आहे. जरांगेंनी अपक्ष उमेदवार किंवा वंचितलाही पाठींबा दिला असता तर महाराष्ट्रात नवं समीकरण पुढं आलं असतं. त्याचा परिणाम महायुती आणि महाविकास आघाडीवरही झाला असता. तसंच जरांगेंचीही अप्रत्यक्षपणे राजकारणात एंट्री झाली असती. मात्र आपल्या निर्णय जरांगेंनी हे स्पष्ट केलंय की राजकारणापासून दूरच असतील.

जरांगे पाटील म्हणाले की, 'मराठा समाज आता हुशार झाला आहे आणि लोक म्हणाले म्हणून आता काम नाही करायचे. आम्ही लोकांपर्यंत पोहचू शकत नाही आणि आणि आमच्याकडे 40 उमेदवार उभे करण्याचा डेटा नाही. काही करायला लागले तर जात संपेल, आणि समाजाची हानी होईल. राहिलेले आरक्षण द्यायला मी खंबीर आहे. मराठा समाजाने कुणाच्याही प्रचाराला जायचे नाही. बारकाईने लक्ष ठेवायचे आता करेकट कार्यक्रम लावायचा.''उद्यापासून विधानसभेच्या तयारीला लागायचे आहे. आम्हाला जे लागते ते द्या मग तुम्ही उताणे पडा किंवा सरळ पडा. आम्हाला राजकारणाशी काही देणे घेणे नाही. तुम्ही करत नाहीत आणि तुम्हीच आम्हाला राजकारणात ढकलत आहात. 112 पेक्षा जास्त विधासभेच्या जागा लढवनार आहोत. मुख्यमंत्री साहेबांवर आमची खूप माया होती, ते कोणत्या पक्षातून कुणीकडे गेले मराठ्यांना काही देणे घेणे नव्हते. शिंदे साहेब आरक्षण देतील असे मी पण म्हणायचो, पण ते मराठ्यांच्या मनातून उतरले आहेत. ''देवेंद्र फडवणीस यांना मी सहा महिने काही बोललो नाही, ते गुन्हे दाखल करत आहेत. मी कोणाला मतदान करा म्हणणार नाही पण जे आरक्षणाच्या बाजूने त्यांना मतदान करायचे. कोणाला पाडायचे हे आता मराठ्यांनी पक्के लक्षात ठेवायचे आहे. 'असं ही ते म्हणाले.

# लोकसभा निवडणूक

## अजित पवार यांच्याविरोधात बंडाची तलवार



बारामती लोकसभा मतदारसंघातून राष्ट्रवादी काँग्रेसच्या अधिकृत उमेदवार म्हणून सुनेत्रा पवार यांच्या नावाची घोषणा केली. बारामती लोकसभा मतदारसंघात शिंदे गटाचे नेते विजय शिवतारे यांनी अजित पवारांविरोधात टोकाची भूमिका घेतली होती. त्यामुळे सुनेत्रा पवार यांच्याबाबत लोकसभा निवडणुकीत दगाफटका होण्याची शक्यता होती. त्यामुळे इतके दिवस अजितदादा गटाकडून सुनेत्रा पवार यांच्या उमेदवारीची घोषणा करण्यात आली नव्हती. परंतु, शनिवारी सकाळीच विजय शिवतारे यांनी अजित पवार यांच्याविरोधात बंडाची तलवार म्यान केली.

## त्या एका फोनमुळे विजय शिवतारे यांची माघार



शिंदे गटाचे नेते विजय शिवतारे यांनी अखेर निवडणुकीतून माघार घेतली आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि अजित पवार यांच्याशी झालेल्या चर्चेनंतर शिवतारे यांनी माघार घेतल्याचं सांगितलं जात आहे. मात्र, प्रत्यक्षात वस्तुस्थिती वेगळी आहे. विजय शिवतारे यांना एका बड्या नेत्याचा फोन आला. या नेत्याने शिवतारे यांची समजूत काढली आणि शिवतारे यांनी निवडणुकीतून माघार घेत असल्याचं जाहीर केलं. स्वत: शिवतारे यांनीच हा गौप्यस्फोट केला आहे. मीडियाशी संवाद साधताना त्यांनी ही माहिती दिली. त्यामुळे हा नेता कोण ? अशी चर्चा आता सुरू झाली आहे.

## दानवे, अमित देशमुखांच्या पक्षप्रवेशाबाबत फडणवीस यांचं विधान



ठाकरे गटाचे नेते आणि विधान परिषदेचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे हे पक्ष सोडण्याच्या तयारीत असल्याची जोरदार चर्चा आहे. दानवे हे भाजपमध्ये जाऊन संभाजीनगरमधून लोकसभा निवडणूक लढणार असल्याचीही जोरदार चर्चा होती. अंबादास दानवे यांनी पत्रकार परिषद घेऊन या चर्चांना पूर्णविराम दिला आहे. मी कोणत्याही पक्षात जाणार नाही. मी उद्धव ठाकरे यांच्यासोबतच राहणार आहे. चंद्रकांत खैरे हे माझे नेते असून त्यांचा प्रचार मी सुरू केला आहे, असं दानवे यांनी स्पष्ट केलं आहे. त्यानंतर उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही अंबादास दानवे भाजपमध्ये येणार नसल्याचं स्पष्ट केलं. दानवेच काय अमित देशमुखही भाजपमध्ये येणार नाही.

# ग्रामीण भागात रंगपंचमी साजरी

**वादळवार्ता/कुडूत्री**
होळीसणानंतर वसंत ऋतूस प्रारंभ झाला आहे. त्यानंतर उन्हाळा सुरू होतो. उन्हाळ्याती पहिला सण रंगपंचमी साजरी केली जाते. उन्हाचा तडाखा कमी व्हावा आणि गारवा जाणवावा, यासाठी यासाठी एकमेकांवर पाणी, रंग उडवून रंगपंचमी सण मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. देशाच्या काही भागात रंगपंचमीला विशेष धार्मिक महत्त्व आहे. रंगपंचमी सणाची महाराष्ट्रासह गुजरात राजस्थानात धूम असते. या दिवशी मुलं आणि



आबालवृद्ध युवक युवती एकमेकांना रंग लावून रंगोत्सव साजरा करतात. धार्मिक मान्यतेनुसार, रंगपंचमीच्या सणाला महाराष्ट्रात एकमेकांवर रंग लावण्याची, रगं-गुलाल उधळण्याची परंपरा आहे. रंगपंचमीच्या दिवशी मित्र परिवार, नातेवाईक गुलाल आणि विविध रंगानी रंगपंचमी खेळतात. प्रत्येकजण आपापल्या परीने रंग-गुलाल उधळून हा दिवस साजरा करतात. लहान मुले फुगे फुगवून एकमेकांना रंग लावतात तर तरुण तरुणी डीजे लावून गाण्याच्या तालावर नाचत रंगाची उधळण करतात.अध्यापना बरोबरच त्यांनी विविध राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय परिषदांमध्ये संशोधन पेपर सादर केले आहेत आणि २५ हून अधिक पेपर प्रकाशित केले आहेत.

मुंबई विद्यापीठाचा वार्षिक दीक्षांत समारंभ २०२३ जो ७ फेब्रुवारी २०२४ पार पडला त्यामध्ये त्यांना विद्यावाचस्पती पदवी प्रदान करण्यात आली.

# अमरसिंह पंडित यांच्या कडून अनिल तुरुकमारे याचा सत्कार

**वादळवार्ता/गेवराई**
पिपल्स रिपब्लिकन पार्टीचे जिल्हाध्यक्ष अनिल तुरुकमारे यांना महाराष्ट्र शासनाचा डॉ.बाबासाहेब आंबेडकर समाज भूषण पुरस्कार मुंबई येथे प्रदान करण्यात आला. पुरस्कार प्राप्त अनिल तुरुकमारे यांचा माजी आमदार तथा राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेश सरचिटणीस अमरसिंह पंडित साहेब यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष भाऊसाहेब नाटकर, सामाजिक न्याय विभागाचे जिल्हाध्यक्ष आनंद सरपते, तालुकाध्यक्ष शिवाजी डोंगरे, बाबासाहेब आठवले, रजनी सुतार, नंदू तुरुकमारे, शामराव इगवे, बबन औटे, प्रा. अजित काळे आदी उपस्थित होते.



# आज नरसी येथे बूथ प्रमुख ग्रामपंचायत सदस्य, सेवा सहकारी सोसायटी सदस्यांचा मेळावा

**दैनिक वादळ वार्ता**
**नायगाव /हानुमंत चंदनकर**
देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी व देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली होऊ घातलेल्या लोकसभा निवडणुकीच्या अनुषंगाने आज दिनांक ३१ मार्च २०२४ रोजी दुपारी १२ वाजता नरसी येथील शिवकृपा मंगल कार्यालयात बूथ प्रमुख, ग्राम पंचायत सदस्य, सेवा सहकारी सोसायटी सदस्य, महायुतीच्या पादाधिकारी, कार्यकर्ता मेळाव्याचे आयोजन करण्यात आल्याची माहीती भाजपा नेते श्रावण पाटील भिलवंडे,बालाजी बच्चेवार, शिवराज पाटील होटाळकर, राजेश कुंटूरकर यांनी दिली आहे.

या मेळाव्याला उदघाटक म्हणून माजी मुख्यमंञी तथा राज्यसभेचे खा.अशोकराव चव्हाण. प्रमुख पाहुणे म्हणून राज्यसभेचे खा.डॉ. अजित गोपछडे, नांदेड लोकसभा मतदार संघाचे उमेदवार खासदार प्रतापराव पाटील चिखलीकर, माजी राज्यमंञी भास्करराव पा. खतगावकर, माजीमंञी सुर्यकांता पाटील, माजीमंञी डॉ. किनाळकर, आमदार राम पाटील रातोळीकर, आमदार राजेश पवार, आमदार तुषार राठोड, माजी आमदार अमर राजूरकर, संघटन मंञी संजय कौडगे, डॉ.संतुकराव हंबरडे, माजी आमदार ओमप्रकाश पोकर्णा, दिलीपराव धर्माधिकारी, गंगाधर बडूरे, गौतम काळे, तालुका अध्यक्ष दत्ता पाटील ढगे सह अनेक नेत्याची उपस्थिती राहणार आहे. तरी या मेळाव्यास नायगाव मतदार संघातील बूथ प्रमुख , ग्राम पंचायत सदस्य, सेवा सहकारी सोसायटी सदस्य, महायुतीचे पदाधिकारी,कार्यकर्ते आदींनी या मेळाव्यास मोठ्या संख्येत उपस्थित राहण्याचे आवाहन भाजपा नेते श्रावण पाटील भिलवंडे, बालाजी बच्चेवार, शिवराज पाटील होटाळकर, राजेश कुंटूरकर यांनी केले आहे.

# भारतीय संविधान साक्षरता वाढविणे काळाची गरज-प्रा. डॉ .विठ्ठल जाधव

**वादळवार्ता/दहिफळ (वड.)**
डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ सलग्नीत व श्री वडमाऊली विद्या प्रसारक मंडळ संचलित शाम गदळे कला व विज्ञान महाविद्यालय दहिफळ (वड.) यांच्या वतीने घेण्यात आलेल्या "युवकांचा नारा, स्वच्छ समृद्ध भारत सारा" हे ब्रीद घेऊन आयोजित करण्यात आलेल्या सात दिवसीय निवासी राष्ट्रीय सेवा योजना शिबिराचा आज मौजे लिंबाचीवाडी येथे मोठ्या थाटात समारोप करण्यात आला. दिपप्रज्वलन करून सुरू झालेल्या कार्यक्रमाच्या अध्यक्ष श्री वडमाऊली विद्या प्रसारक मंडळाच्या कोषाध्यक्षा मा.डॉ. शालिनीताई कराड (मा. सदस्य महाराष्ट्र राज्य महिला आयोग ), प्रमुख पाहुणे संविधान अभ्यासक डॉ. विठ्ठल जाधव,तात्यासाहेब डोईफोडे, लिंबाचीवाडी गावचे मा. सरपंच भिकचंतद काकड, उपसरपंच मा. माने, श्री. हनुमंत हराळे, प्र. प्राचार्य अनंत मुंडे आदी उपस्थित होते. महाविद्यालयाने छोट्याशा गावात राबवलेल्या उपक्रमांचे कौतुक करत आपल्या मार्गदर्शनपर भाषणात संविधानातील मुलभूत कर्तव्य व अधिकारांची समाजातील प्रत्येक घटकाला योग्य ती जाण असावी. त्यासाठी समजातील सुशिक्षितंनी भारतीय संविधान साक्षरता करणे काळाची गरज बनली आहे. असे स्पष्ट मत त्यांनी मांडले. तर आपल्या अध्यक्षीय समारोपपर भाषणात वडमाऊली विद्या प्रसारक मंडळाच्या कोषाध्यक्ष डॉ. शालिनीताई कराड यांनी लिंबाचीवाडी गावाशी बालपणापासूनच्या आठवणींना उजाळा देत कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी लिंबाचीवाडी गावने दिलेल्या प्रेमाचा, मायेचा ओलावा असाच अखंडपणे कायम रहावा अशी इच्छा व्यक्त केली. या वेळी स्थानिक नियामक मंडळाचे अध्यक्ष तात्यासाहेब डोईफोडे यांनी आपले मनोगत व्यक्त केले. महाविद्यालयाचे प्र.प्राचार्य अनंत मुंडे यांनी सदरील कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले तर प्रमुख



पाहुण्यांचा परिचय डॉ. कृष्णा नागरे यांनी करून दिला. सदरील कार्यक्रमाचे सुत्रसंचलन डॉ. शांता जाधवर यांनी तर आभार प्रा. संतोष शिंदे यांनी मानले. यावेळी डॉ. प्रकाश चिलवंत, डॉ. बापू गुजर, डॉ. बन्सी पाटोळे, प्रा. विठ्ठल शिंदे, उपप्राचार्य प्रा. गंदगे सर,प्रा.धनराज भालेराव, रा.से.यो. विद्यार्थी प्रतिनिधी कु. कोमल सानप, गोकुळ डोईफोडे यांच्यासह शाम गदळे महाविद्यालय, शाम माध्य. व उच्च माध्य. विद्यालयातील प्राध्यापक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांच्यासह विद्यार्थी - विद्यार्थिनी, गावकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## संपादकीय

# आवळा आहे फायदेशीर

मधुमेह हा भारतात मोठ्या प्रमाणात वाढत चालला आहे. अगदी कमी वयात देखील लोकांना मधुमेह होत आहे. भारत आता मधुमेहाची राजधानी झाला आहे. व्यक्तीच्या शरीरात इन्सुलिनचा योग्य वापर होत नाही किंवा ते आवश्यकतेपेक्षा कमी प्रमाणात सोडले जाते. त्यामुळे रक्तातील साखरेचे प्रमाण वाढू लागते. यालाच मधुमेह असे म्हणतात. मधुमेहाच्या आजारात आवळा हा महत्त्वाचा ठरु शकतो. आवळा हा पोषक तत्वांनी युक्त असं फळ आहे. यामध्ये व्हिटॅमिन सी, फायबर, फोलेट, फॉस्फरस, कार्ब्स, मॅग्नेशियम, कॅल्शियम, लोह आणि अँटी-ऑक्सिडंद्व हे पोषक घटक असतात. त्यामुळे मधुमेहाच्या रुग्णांसाठी हे खूप फायदेशीर ठरू शकते.

आवळा आपल्या शरीराला अनेक प्रकारचे पोषण देतात. त्यामुळे आपण निरोगी राहतो. आवळा खाल्ल्याने अनेक आरोग्याचे फायदे मिळतात, ज्यामुळे रक्तातील साखरेची पातळी राखण्यात खूप मदत होते. जाणून घ्या काय आहेत त्याचे फायदे.

आवळा पावडर

आवळा सुकवून त्याची पावडर तयार करु शकता. किंवा बाजारात देखील ती उपलब्ध असते. ही पावडर तुम्ही स्मूदी, दही किंवा दलियामध्ये मिसळून खाऊ शकता. आवळा त्याच्या पौष्टिक गुणांमध्ये आरोग्यासाठी फायदेशीर ठरतो.

आवळ्याचा रस

आवळा बारीक करून त्याचा रस काढून त्यात थोडे काळे मीठ मिसळून सकाळी रिकाम्या पोटी सेवन करणे फायदेशीर ठरते. यामुळे रक्तातील साखरेची पातळी नियंत्रित राहण्यास मदत होते.

आवळा लोणचे

आवळे हलकी वाफवून त्यात तिखट, हळद, मोहरी, बडीशेप, जिरे, सेलेरी यांसारख्या मसाल्यांनी मॅरीनेट करा आणि चवीनुसार मीठ घालून चांगले मिसळा आणि लोणचे तयार करा. जेवणात चव वाढवण्यासोबतच रक्तातील साखरेची पातळी राखण्यास मदत होते.

आवळा चटणी

हिरवी मिरची, लसूण, आले, पुदिन्याची पाने आणि चवीनुसार मीठ घालून उकडलेल्या आवळ्यात बारीक करून चटणी तयार करा. तुम्ही दिवसाच्या कोणत्याही वेळी तुमच्या जेवणासोबत ते आरामात खाऊ शकता. हे पचनासाठीही खूप फायदेशीर आहे.

आवळा कोशिंबीर

किसलेला आवळा गाजर, बीटरूट, काकडी, मुळा, आले आणि काही हिरव्या पालेभाज्या मिसळून सॅलड तयार करा. त्यामुळे जेवणाची चव वाढेल

## गुडघ्याच्या सांध्याच्या दुखापती

जसे की दुखापत, फ्रॅक्चर, सांधा निखळणे आणि अस्थिबंधन फाटणे इत्यादींमुळे गुडघ्यावर दुष्परिणाम होतो. प्रौढांमध्ये एक सामान्य घटना आहे. या जखमा ब्रेसिंग आणि व्यायाम यासारख्या पद्धती वापरून व्यवस्थापित केल्या जातात, मात्र गंभीर प्रकरणांमध्ये शस्त्रक्रियेची आवश्यकता भासू शकते. आर्थ्रोस्कोपी बहुतेकदा गुडघ्याच्या दुखापतींचे निदान आणि उपचार दोन्हीसाठी वापरली जाते, वेदना कमी करण्यासाठी किंवा सांध्याचे नुकसान होऊ नये यासाठी हा एक सर्वोत्तम उपाय आहे. गुडघ्याचा आर्थ्रोस्कोपी म्हणजे काय? आर्थ्रोस्कोपीत त्वचेमध्ये लहान चीरा देऊन आर्थ्रोस्कोप घालून सांध्यांची तपासणी केली जाते. व्हिडीओ कॅमेरा, लाइट सोर्स आणि रिन्सिंग/सक्शन डिव्हाईसने आर्थ्रोस्कोप सर्जनला स्क्रीनवर निरीक्षण करुन योग्य तपासणी करता येते. गुडघ्याच्या कोणत्याही समस्यांचे निदान करण्यासाठी आर्थ्रोस्कोपमधील लहान उपकरणे वापरली जातात. गुडघ्याच्या समस्यांसाठी गुडघ्याच्या आर्थ्रोस्कोपी केली जाते. जसे की मेनिस्कस टिअर, अस्थिबंधनांसंबंधी दुखापत, फ्रॅक्चर आणि सांधे निखळणे.

आर्थ्रोस्कोपीचे फायदे तत्काळ उपचार: गुडघ्याच्या आर्थ्रोस्कोपीमुळे सांधे दुखापतींचे आणि वेदनेचे त्वरित निदान आणि उपचार करणे शक्य होते. या पध्दतीमुळे निदान आणि उपचारादरम्यान दीर्घकाळ प्रतीक्षा करावी लागत नाही. कमीत कमी जोखीम: रुग्णांसाठी सकारात्मक दृष्टीकोनासह, या प्रक्रियेमध्ये बहुतेक प्रकरणांमध्ये कमीतकमी जोखीम असते. पुनर्प्राप्तीस लागणारा वेळ आणि रोगनिदान हे गुडघ्याच्या समस्येच्या तीव्रतेवर आणि प्रक्रियेनुसार बदलू शकतात. मिनीमली इन्व्हेसिव्ह: त्वचेच्या लहान चीरांद्वारे सांध्यामध्ये घातलेल्या लहान साधनांचा वापर करणे, आर्थ्रोस्कोपी ही एक कमीतकमी हल्ल्याची प्रक्रिया आहे, ज्याला कीहोल शस्त्रक्रिया देखील म्हणतात, ज्यामुळे सांधे संरचनेत फारसा व्यत्यय न आणता शस्त्रक्रिया करता येतात. स्नायुवरील ताण कमी: खुल्या शस्त्रक्रियेच्या विपरीत, गुडघ्याच्या आर्थ्रोस्कोपीमुळे सांधे निरोगी बनतात, परिणामी शरीरावर कमी ताण येतो. यामुळे शस्त्रक्रियेनंतरच्या वेदना कमी केल्या जातात. अचूक निदान: गुडघ्याच्या आर्थ्रोस्कोपीचा आणखी एक फायदा म्हणजे गुडघ्याच्या विविध स्थितींचे अचूक निदान करण्याची आणि आसपासच्या ऊतींना कमीतकमी व्यत्यय आणून त्यावर उपचार करण्याची क्षमता. लहान कॅमेरे वापरुन तसेच विशेष उपकरणांच्या सहाय्याने गुडघ्याच्या सांध्याच्या आतील भागाचे निरीक्षण करणे, आतील भागांची पाहणा आणि अस्थिबंधनाच्या दुखापतींसारख्या समस्यांना प्रभावीपणे हाताळण्यास मदत होते.

# मनाचे सौंदर्य

सौंदर्य हे अनेक प्रकारचे असते. आणि ते पाहणाऱ्याच्या नजरेत असते. मग ते कोणत्याही गोष्टीत असू द्या. सौंदर्य हे मनाला निर्मळ,निर्भेळ आनंद देणार असतं. फक्त माणसाने ते शोधावे. किंवा शोधण्या पेक्षा त्याच्या शोधक नजरेने टिपलं पाहिजे. किंवा जिज्ञासा वृत्तीने ते पाहायला शिकले पाहिजे. सृष्टीच्या गर्भातून येणारा सकाळचा सूर्य असो. किंवा एखादा उंचावरून कोसळणारा, फेसाळणारा धबधबा असो. किंवा एखाद्या लहान बालकाचे स्मित हास्य असो किंवा एखाद्या नवयुतीचे लज्जास्पद स्मित हास्य असो. अथवा इकडून तिकडे बागडणारी रंगीबेरंगी फुलपाखरे असो. फक्त त्याकडे पाहण्याची त्याची दृष्टी तशी हवी. 'म्हणजे जशी दृष्टी तशी सृष्टी'. सौंदर्य फक्त पाहणाऱ्याच्या नजरेत असावं लागतं. तरच त्याला ते सौंदर्य कळते. नाही ते कळतच नाही. 'सौंदर्य ही गोष्ट खूप व्यापक आहे. फक्त त्यात विकृतीचे दर्शन नसावे. नाही तर सौंदर्य हे शाप ठरू शकते'. स्त्रीचे सौंदर्य पाहताना त्यात विकृत भावना नसावी, असावी ती फक्त सोज्वळता, निरागसता, निर्मळता, निर्भेळता की ज्यामुळे ते फक्त आणि फक्त हे पाहताना निर्मळ सौंदर्य असावं. एखादी स्त्री रस्त्याने चालली असेल तर तिची वेशभूषा, केशभूषा तिचं ते अनुपम सौंदर्य हे भक्ष ठरण्याची शक्यता असते. परंतु तेच निखळ सौंदर्य म्हणून पाहिले तर त्याची वाह! वाहा! व्हायला हवी. अशा सौंदर्याचे परिणाम अनेक स्त्रियांना वेळप्रसंगी भोगावे लागतात. त्यांचं चांगलं दिसणं हे देखील शापासमानच आहे. कारण येथील काही दुष्टवृत्ती प्रवृत्तीच्या लोकांची त्यावर वक्रदृष्टी पडू शकते. म्हणूनच काही सुंदर स्त्रियांना त्यांचे वाईट परिणाम भोगावे लागतात. कारण येथे काही वासनांध पुरुषही असतात. म्हणूनच सौंदर्याचे प्रदर्शन किती व कुठ पर्यंत करावं हे स्त्रियांनी ठरवणे फार महत्त्वाचे आहे. सौंदर्य फक्त दिसण्यातच असतं, किंवा शारीरिकच असतं असं नाही. तर ते बौद्धिक सौंदर्य ही असतं. वैचारिक सौंदर्य ही असतं 'शेवटी शारीरिक सौंदर्या पेक्षा तुमचं बौद्धिक, वैचारिक सौंदर्य सर्वात जास्त सरस असतं'. म्हणूनच 'दिसण्यापेक्षा असंण फार महत्त्वाचं असतं'. खरं तर सौंदर्य हे निसर्गाने दिलेली देणगी आहे. प्रत्येकालाच ते मिळत असं नाही पण ज्याला ते मिळालं आहे त्यांन ते सौंदर्य जपण्याचा प्रयत्न करावा. फक्त त्यात कशाचाही अतिरेकपणा, भडकपणा नसावा.किंवा कोणत्याही कृतीमतेची जोड देता कामा नये. तरच ते सौंदर्य अबाधित राहते.



'त्यात कसलाही नाटकीपणा नसावा फक्त नीटनेटकेपणा असावा.' जसं शरीराचं सौंदर्य आहे. तसेच निसर्ग सौंदर्य ही आहे. फक्त न्याहाळता पाहिजे. त्यात आपली शोधक नजर, कुशाग्र बुद्धी पाहिजे. निसर्ग सौंदर्याने माणसाचं मन पुलकित होतं. उत्साही होतं. मनाला निसर्ग सौंदर्याने सकारात्मक ऊर्जा,जोश,जोम भरतो. म्हणूनच निसर्ग सौंदर्याला सुद्धा अनान्य साधारण महत्व आहे. व्यक्तिमत्व सौंदर्य हे देखील महत्त्वाचे आहे. आपण सुद्धा जर चांगले व्यवस्थितपणे राहिलो तरच आपलं व्यक्तिमत्व चांगले फुलते. म्हणजे आपली लोकांबरोबर बोलण्याची, वागण्याची पद्धत चांगली असेल,आपल्या अंगी नम्रता असेल,प्रामाणिकपणा असेल तर आपल व्यक्तिमत्व हे आहे त्यापेक्षा दुपटीने खुलते. अन् आपल्या व्यक्तिमत्त्वाकडे पाहून लोक आकर्षित होतात. म्हणूनच 'व्यक्तिमत्व सौंदर्य' हे देखील तेवढेच जरुरीचे आहे. सौंदर्य म्हणजे काय तर मनाला आनंद देणाऱ्या गोष्टीला सौंदर्य म्हणतात. मग ते कशातही असू शकते. अगदी गाढवाच्या लहान पिल्लातही ते दिसते. गाढवाचे लहान पिल्लू कोणी पाहिले नसेल पण ते एकदा पहा. गाढवाचं लहान पिल्लू पाहिले की ते कितीतरी गोंड सुंदर आपल्याला हव,हवसं वाटणार असतं. घोड्याच्या जातीतील खेचरात ही ते पाहायला मिळतं. एवढेच नाही तर आपण ज्याला कोणाला वाईट भावनेने डुक्कर म्हणून उपमा देतो. अगदी त्याचे लहान पिल्लू सुद्धा तुम्ही पहा. ते पाहिलं की किती तरी सुंदर निसर्गाचा चमत्कार वाटतो. फक्त तुम्ही त्याचा अनुभव घ्या. मग कळते की सौंदर्य म्हणजे काय आणि ते कशात असते. कुत्र्या मांजरीची लहान पिल्ले सुद्धा पहा ना! त्यांना जवळ घ्या. त्यांचे त्या वयातलं दिसणं. किती तरी मनमोहक असतं. त्या लहान वयात ते माणसाला नक्कीच आनंद देऊन जातात. ती आपल्याला हवी हवीशी वाटतात. खऱ्या अर्थाने त्यांचे ते हेच सौंदर्य. अंग प्रदर्शन किंवा स्त्रीची मादकता म्हणजे सौंदर्य नव्हे. 'सौंदर्य हे पाहणाऱ्याच्या दृष्टीत असावे लागते'. ज्याला जसे भासेल त्याला ते तसे दिसते. 'खरं तर सौंदर्य हे निरागस बालका सारखे,उघड्या डोळ्यांनी,निर्मळ मनाने, स्वच्छंदी तसेच सुसंस्काराने पहिले कि ते दिसते. स्वैरचाराचे सगळे प्रहार तेथे आपोआप मिटतात. म्हणजे जसा ज्याचा गॉगल त्याला तसे ते समजले दिसते. कोणाला ते कशा दिसेल हेही सांगता येत नाही. त्याची दृष्टी चांगली असावी. तुम्ही सांगा! सौंदर्य कशात नाही.? तर प्रत्येक गोष्टीत सौंदर्य आहे. या सृष्टीतील उगवत्या सूर्या पासून ते चंद्र तारे सुद्धा किती तरी मोहक दिसतात. सभोवताली फुलणारी फुलझाडे पहा. त्यातील नानाविध रंगीबेरंगी फुले पाहिली की त्या सौंदर्याने मनाला आल्हादायक वाटते. शाळेतील लहान मुले बागडताना पाहिली की सौंदर्याचा अर्थ कळतो. त्यांचे ते बोबडे बोल, गोंडसपणा मनाला सौंदर्याचा धक्का देऊन जातो. इकडून तिकडे बागडणारी चिमणी पाखरे त्यांची लहान पिल्ले पाहिली की सृष्टी किती सौंदर्यान नटली आहे. याचे दर्शन होतं. उंच डोंगर, महाकाय विशाल सागर, डोंगराच्या कुशीतील झऱ्यातून निर्मळ येणारे, खळखळणारे पाणी पाहिले की निसर्ग किती महान आहे हे जाणवतं. निसर्गातून येणारी थंडगार वाऱ्याची झुळूक, मनाला स्पर्शून जाते. झाडांचे लहान रोपटी, गवताची हिरवीगार लवलवणारी पाती निसर्गाची देण आहे. फक्त माणसाने सौंदर्याचा अर्थ ध्यानात घेऊन त्या सौंदर्याच गुणगान करायला हवं. ते पहायला हवं. म्हणूनच सौंदर्य पाहायचं असतं. मनात साठवायचं असतं.आठवायचं असतं. आणि त्याचा अर्थ समजून घ्यायचा असतो. आणि म्हणूनच 'मनाचं सौंदर्य हेच खरं सौंदर्य'.

**पांडुरंग म्हस्के**

# बारामतीत नणंद विरूद्ध भावजय सामना

अजित पवारांच्या राष्ट्रवादीकडून सुनेत्रा पवार यांना उमेदवारी जाहीर झालीये. त्यामुळं नणंद विरुद्ध भावजय अशी थेट लढत बारामतीत होणार आहे. बारामतीतच्या अजित पवार गटाच्या अधिकृत उमेदवार म्हणून सुनेत्रा पवारांच्या नावाची घोषणा झाली, अजित पवार गटाचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांनी अजित पवारांच्या पत्नी सुनेत्रा पवारांची उमेदवारी घोषित केली. त्यासोबत बारामतीत नणंद विरुद्ध भावजय अशी थेट लढत निश्चित झाली.

बारामतीत कांटे की टक्कर

लोकसभा निवडणुकीची घोषणा होण्याच्या आधीपासूनच, सुनेत्रा पवार यांनी प्रचार सुरु केलाय. तेव्हापासून सुनेत्रा पवारच बारामतीतून दादांच्या उमेदवार असतील हेही स्पष्ट झालं होतं. अखेर अधिकृत घोषणा झाली आणि सुनेत्रा पवारांच्या नावावर शिक्कामोर्तब झालं. सध्या प्रचारातही बदल आवश्यक आहे, असं सांगतानाच सुनेत्रा पवार मतदारांना आपल्या विजयी करण्याचं आवाहन करत आहेत.

महिन्याभरापासून अजित पवारही बारामती लोकसभा मतदारसंघात जोरदार प्रचार करत आहेत. विकासासाठी माझ्याच उमेदवाराला विजयी करा असं आवाहन करत आहेत. विशेष म्हणजेच, बारामतीत विजय शिवतारेंचं बंडही शांत करण्यात अजित पवारांना यश आलं आहे. शिंदे फडणवीस आणि अजित पवारांच्या बैठकीनंतर, शिवतारेंनी बारामतीतून माघार घेत असल्याची घोषणा केलीये.

बंडखोरी रोखण्यात यश

विजय शिवतारे यांच्या आधी हर्षवर्धन पाटील आणि त्यांच्या कार्यकर्त्यांचंही समाधान झालं. त्यामुळं इंदापूरमधूनही सुनेत्रा पवारांचा मार्ग मोकळा झाला आहे. आता नणंद भावजयच्या लढाईत कोण जिंकत याचा फैसला 4 जूनलाच कळेल. बारामती लोकसभा मतदारसंघाची निवडणूक यावेळी अतिशय रंजक असणार आहे. शरद पवार यांच्या कन्या सुप्रिया सुळे या या मतदारसंघातून तीन वेळा खासदार आहेत. बारामती हा राष्ट्रवादी काँग्रेसचे संस्थापक शरद पवार यांचा कौटुंबिक बालेकिल्ला मानला जातो.

# कालिकादेवी माध्य व उच्च माध्यमिक विद्यालयात,लोकनेत्या स्व.केशरबाई (काकू) क्षीरसागर यांचा जन्मदिन साजरा...

**वादळवार्ता/शिरूर कासार**

दि.३०मार्च २०२४ शनिवार रोजी कालिकादेवी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात,"बीड जिल्ह्याच्या लोकनेत्या,कर्मयोगिनी स्व.केशरबाई (काकू) क्षीरसागर" यांचा जन्मदिन साजरा करण्यात आला. विद्यालयाचे मुख्याद्यापक तथा प्राचार्य आप्पासाहेब येवले यांच्या मार्गदर्शनाखाली प्रा. सविता दराडे,प्रा.रेखा निर्मळ,प्रा.सिमा ढवळे व ॲड.नारायण खेडकर यांच्या हस्ते 'लोकनेत्या स्व.केशरबाई (काकू) क्षीरसागर' यांच्या प्रतिमेला पुष्पांजली अर्पण करून विनम्र अभिवादन करण्यात आले.यावेळी उपप्राचार्य बसवेश्वर देशमाने,पर्यवेक्षक रमेश खोले,प्रा.नामदेव तरकसे प्रा.नारायण घोलप यांची विशेष उपस्थिती होती. प्राचार्य आप्पासाहेब येवले यांनी आपल्या भाषणातून 'काकूंचे सामाजिक, शैक्षणिक, राजकीय,सांस्कृतिक आणि सहकार विषयक योगदान स्पष्ट केले. त्याच बरोबर काकूंना गोरगरिब,कष्टकरी,शेतकरी,आणि दीन-दलितांच्या प्रगतीची खूप तळमळ होती. म्हणून त्यांनी ग्रामीण भागात शाळा/कॉलेज,तसेच साखर कारखाना,बँका सुरू केल्या यामुळे अनेक कुटुंबं उभी राहिली हे त्यांचे कार्य आपणास विसरता येणार नाही,असेही ते म्हणाले.



यावेळी प्रा.प्रशांत मळेकर,प्रा. अशोक इनकर,प्रा. नारायण घोलप,प्रा.अनिल जरे,प्रा.महादेव हांगे,डॉ.सत्यनारायण ढवळे,डॉ. आत्माराम झिंजुर्डे,प्रा.दत्ता गायकवाड,प्रा. महारूद्र डोंगरे,प्रा.घनश्याम चव्हाण,प्रा. सुनिल मोरे,प्रा.नारायण तांबे,डॉ.अशोक घोडके,प्रा.अशोक सवासे,प्रा.शशिकांत जावळे,प्रा.विनोद गलांडे,प्रा.बाळासाहेब खटाणे,प्रा.हनुमंत घायाळ,सौ. अनिता लाटे,रविंद्र बडे,बाळासाहेब येवले,आप्पासाहेब कांबळे आबासाहेब ढवळे,अर्जून नेटके,आर.एम.बडे,जयेंद्र निकम,नितीन बहिर,रोहित शिराळे,सुनिल खेडकर, विलास कांबळे, गौतम भोसले, सौ.कुसुमबाई ढिसले तसेच सर्व कनिष्ठ प्राध्यापक,सहशिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी या सर्वांनी काकूंच्या प्रतिमेला पुष्प वाहून अभिवादन केले.

# ब्लू बेल्स इंग्रजी शाळेत यु.के. जी.पदवीदान संभारभ सपन्न.

दैनिक वादळ वार्ता
नायगाव /हानुमंत चंदनकर


नायगाव येथील ब्लू बेल्स इंग्रजी माध्यम शाळेत पहिल्यादांच युकेजी विद्यार्थ्यांचा पदवीदान संभारभ संपन्न झाला यावेळी मान्यवंराच्या हस्ते विद्यार्थ्यांना पदवी देऊन सन्मान करण्यात आले.

दि.२९ मार्च २०२३ रोजी नायगाव येथील नामांकित असलेली ब्लू बेल्स इंग्रजी माध्यम शाळेत पहिल्यादांच यु.के.जी.विद्यार्थ्यांच्या पदवीदान कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी नायगाव येथील सुप्रसिद्ध डॉक्टर शेख अनीस यांची उपस्थिति होती तर प्रमुख पाहुणे म्हणून शरदचंद्र महाविद्यालयाचे सेवानिवृत्त प्राध्यापक डॉ.शंकर गड्डमवार सर, पत्रकार शेख आरीफ, पत्रकार हनमंत चंदनकर यांची उपस्थिति होती यावेळी डॉक्टर शेख अनीस यांनी मार्गदर्शन करताना म्हणाले की,समाजामध्ये वावरण्यासाठी शिक्षण हे महत्वाचे असून हरिबाबू सर यांनी ब्लू बेल्स शाळेचा पाया मजबूत केला आहे यामूळे अनेक विद्यार्थी येथे घडत आहेत डॉ.हरिबाबू सर व शाळेच्या मुख्याध्यापिका सीता महालक्ष्मी मॅडम यांच्या अथक परिश्रमामुळे ब्लू बेल्स हि शाळा तालुक्यातच नव्हे तर जिल्ह्यात नावारूपाला आली आहे असे सांगून हरीबाबू व लक्ष्मी मॅडम यांचे तोंडभरून कौतुक करून विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन केले तसेच मान्यवंराच्या हस्ते विद्यार्थ्यांना सन्मान चिन्ह व पदवी देवून गौरविण्यात आले यावेळी विद्यार्थ्यांनी नृत्य कलाही सादर केली यावेळी विद्यार्थ्यांसह पालकांची मोठी उपस्थिति होती या सर्व पुरस्कार प्राप्त पदवीदान विद्यार्थ्यांचे शाळेचे संस्थापक अध्यक्ष डॉ.के.हरिबाबू सर, मुख्याध्यापिका सीता महालक्ष्मी मॅडम, पर्यवेक्षक साईदिप्ती मॅडम,दत्ता कंदुरके सर,कानगुले सर यआसह शाळेतील सर्व शिक्षक,शिक्षीकाल व कर्मचारी यांनी अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या सदर कार्यक्रम यशस्वीतेसाठी हेमा,विजय मला,सविता देवकांबळे,भाग्यश्री, सुनिता टीचर यासह आदींनी परिश्रम घेतले..हानुमंत चंदनकर नांदेड

# दिल्ली मध्ये बीड जिल्ह्याचा बुलंद आवाज करण्यासाठी लोकनेत्या पंकजा ताई मुंडे यांना मोठ्या मताधिक्याने निवडून द्या-सय्यद रैफ भाई (बिल्डर)

**दैनिक वादळ वार्ता**
**अंबाजोगाई/परवेज पटेल**

भारतीय जनता पक्षाने लोकनेत्या पंकजाताई मुंडे यांना बीड लोकसभेची उमेदवारी जाहीर केली आहे. दिल्ली मध्ये बीड जिल्ह्याचा बुलंद आवाज करण्यासाठी लोकनेत्या पंकजाताई मुंडे यांना मोठ्या मताधिक्याने निवडून द्यावे, असे आवाहन युवा नेते सय्यद





रैफ भाई बिल्डर यांनी केले आहे. लोकनेते स्व. गोपीनाथ मुंडे साहेबांनी महाराष्ट्रातील आठरा पगड जातीला न्याय दिला. सामान्य माणसाचे दुःख दूर करण्यासाठी संबंध आयुष्यभर काम केले. त्यांचा महाराष्ट्रासह दिल्लीमध्येही दबदबा होता. पुन्हा एकदा बीड जिल्ह्याचा आवाज दिल्लीमध्ये बुलंद करण्यासाठी लोकनेत्या पंकजाताई मुंडे यांना मोठ्या मताधिक्याने निवडून द्यावे. तसेच लोकनेत्या पंकजाताई मुंडे यांना निवडून आणण्यासाठी सय्यद रैफ भाई बिल्डर युवा नेते पदाधिकारी व कार्यकर्ते व कार्यसम्राट मा, नगरअध्यक्ष पापा मोदी यांच्या नेतृत्वाखाली मोठ्या ताकदीने काम करणार असल्याची माहिती देखील सय्यद रैफ भाई बिल्डर यांनी दिली आहे,

# निवडणुकीसाठी डॉक्टरांनाही इलेक्शन ड्युटी आरोग्य व्यवस्थेत आयोगाची खुट्टी !

**वादळवार्ता/ परवेज पटेल**

लोकसभा निवडणुकीसाठी पहिल्यांदाच शिक्षकांबरोबर डॉक्टरानाही इलेक्कान ड्युटी लावली जाणार आहे. यामुळे रुग्णांच्या सेवेची पूर्ण जबाबदारी रुग्णालयात काम करणान्या इतर डॉक्टरांवर येऊन पडणार आहे. तसेच, पामुळे रुग्णांची गैरसोय देखील होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. कारण निवडणुकीच्या काळामध्ये डॉक्टरांना देखील अतिरिक्त काम करावे लागेल. मुख्य म्हणजे, यापूर्वी कधीही निवडणुकीच्या कामाची जबाबदारी डॉक्टरांवर सोपवण्यात येत नव्हती. परंतु यंदाच्या निवडणुकीत पहिल्यांदा डॉक्टर्स इलेक्शनची कामे करताना दिसणार आहेत. समोर आलेल्या माहितीनुसार मुंबई महापालिकेच्या केईएम, सायन, नायर, कुपर आणि नायर डेंटल रूग्णालयातील एकूण ५०० डॉक्टरांना इलेक्शनची ब्यूटी लावली जाणार आहे. यात नर्सपासून ते डिनपर्यंतचा समावेश असणार आहे. या सर्वांना निवडणुकीची कामे करावी लागणार आहेत. परिणामी यामुळे रुग्णालयातील रुग्णांचे हाल होऊ शकतात. तसेच, कमी स्टाफ असल्यामुळे इतर डॉक्टरांवरील कामाचा भार बाढू शकतो. कारण की, मुंबईच्या महापालिका रुग्णालपातील ८० टक्के स्टाफ इलेक्शन अनुटीवर जाईल. खरे तर निवडणुकीच्या कामातून डॉक्टर आणि वैद्यकीय कर्मचा-यांना वगळले असताना ही यंदा निवडणूक आयोगाने डॉक्टरांना निवडणूक ड्युटीवर हजर राहण्याचे आदेश दिले आहेत. यामध्ये केईएम रुग्णालयातील ९०० पैकी ६०० नर्सेसना इलेक्शन ड्युटीवर बोलवण्यात आले आहे. यामुळे विचार कर्मचाऱ्यांवरील भार वाढेल असे म्हटले जात आहे. तर दुस-या बाजूला याच मुद्दाला घेऊन राज ठाकरेंनी निवडणूक आयोगावर टीका केली आहे. जर शिक्षकाना आणि डॉक्टरांना कामाला लावायचे आहे तर निवडणूक आयोगाचे काम काय? असा सवाल राज ठाकरेंनी उपस्थित केला आहे. दरम्यान निवडणुका आयोगाने शिक्षकांना निवडणुकीची उयूटी लावल्यानंतर शारदाश्रम शाळेतील विद्यार्थ्यांच्या पालकांनी राज ठाकरेंची भेट घेतली होती. यावेळी या पालकांनी मुंबईतील शिक्षकांना आयोगाने कामाला लावले तर गुलांना शिकवणार कोण असा सवाल उपस्थित केला होता. या मुद्याला धरूनच राज ठाकरे यांनी निवडणूक आयोगाला चांगलेच सुनावले आहे. तसेच, शिक्षकांनी निवडणूक आयोगाच्या कामाला जाऊ नये'असे देखील सांगितले आहे.

## भाजप पुरस्कृत महायुतीने पीपल्स रिपब्लिकन पार्टी कवाडे गट ला विचारात घ्यावे अन्यथा वेगळा विचार करू - राकेश साळवे

माजलगाव (प्रतिनिधी ) महाराष्ट्रामध्ये महायुतीचे मित्र पक्ष म्हणून भाजपा, शिवसेना( शिंदे गट ) राष्ट्रवादी काँग्रेस( अजित पवार गट ) पीपल्स रिपब्लिकन पार्टी जोगेंद्र कवाडे गट यास अनेक मित्र पक्षांनी मिळून बनलेली महायुती आहे मात्र लोकसभेची रणधुमाळी चालू झाल्यानंतर बीड जिल्ह्यातील भाजपच्या राष्ट्रीय सरचिटणीस लोकसभेच्या महायुतीच्या अधिकृत उमेदवार पंकजाताई मुंडे यांना छोट्या छोट्या मित्र पक्षाचा विसर पडत असल्याचे दिसत आहे काल पंकजाताई मुंडे माजलगावच्या दौऱ्यावर होत्या दौऱ्यामध्ये त्यांनी अनेक मराठा नेत्यांच्या घरी भेटी दिल्या यावेळी त्यांनी स्वतःहून मित्र पक्ष म्हणून पीपल्स रिपब्लिकन पार्टीच्या कार्यकर्त्यांना विचारात घेणं आवश्यक होतं मात्र तसे होताना दिसते नाही यामुळे भारतीय जनता पार्टीला मित्र पक्षांचा विसर पडला की काय अशी चर्चा पीपल्स रिपब्लिकन पार्टीच्या कार्यकर्त्यात व्यक्त केले जात होती भाजप पुरस्कृत महायुतीने पीपल्स रिपब्लिकन पार्टीला एक मित्र पक्ष म्हणून तात्काळ विचारात घ्यावे अन्यथा आम्हाला वेगळा विचार करावा लागेल असे मत पीपल्स रिपब्लिकन पार्टीचे तालुकाध्यक्ष राकेश साळवे यांनी व्यक्त केले महाराष्ट्र मध्ये गत पंचवार्षिक निवडणुकीमध्ये स्वर्गीय गोपीनाथरावजी मुंडे साहेबांनी भाजप शिवसेना, रिपाई, रासप, पीपल्स रिपब्लिकन पार्टी जोगेंद्र कवाडे गट यासह अनेक छोट्या-मोठ्या मित्र पक्षांची नोटबंदी निर्माण महायुती केली व मुंडे साहेबांना विजयी मिळाला मात्र दुर्दैवाने अपघातात मुंडे साहेबांचे निधन झाले त्यानंतर हे पोटनिवडणुकीत प्रीतम ताई मुंडे यांना भरघोस मताने बीड जिल्ह्यातील विजय केले मात्र यावेळी शिवसेना राष्ट्रवादी विभागून त्यांना महायुतीमध्ये मध्ये समाविष्ट करून घेण्यात आले यामध्ये राजकारणी अजित पवार, सध्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व भाजपामध्ये काँग्रेसमधील अनेक समाविष्ट करून घेतलेले नेते अहमपणा आल्याचे दिसते आहे यावेळी च्या निवडणुकीमध्ये भाजपा पुरस्कारात महायुती अ धिकृत उमेदवार म्हणून पंकजाताई मुंडे यांना उमेदवारी घोषित झाली आहेमात्र त्यांना या छोट्या मित्र पक्षाचा विसर पडला तरी पीपल्स रिपब्लिकन पार्टीला तात्काळ विचारात घ्यावे अन्यथा वेगळा विचार करू असे तालुकाध्यक्ष राकेश साळवे विधानसभा अध्यक्ष सिद्धार्थ ससाणे, धारूर तालुकाध्यक्ष राजेश सोनवणे

# यांनाच मतदान करा, बाकीचे पाडून टाका आता मराठे मोकळे; मनोज जरांगे यांचं मराठा समाजाला आवाहन



**वादळवार्ता/संभाजीनगर**

लोकसभा निवडणुकीमध्ये मराठा समाजाच्या आंदोलनाचं नेतृत्त्व करणाऱ्या मनोज जरांगे यांच्या भूमिकेकडे राज्याचं लक्ष लागलं होतं. प्रत्येक गावामधून मराठा समाजाचा उमेदवार देणार असल्याची चर्चा होती. मनोज जरांगे यांनी आपली भूमिका स्पष्ट केली असून कोणाला मतदान करायचं हे सांगत कोणत्या उमेदवाराला पाडायचं हे सांगितलं आहे. का आता मराठे मोकळे राहिले, ते आता टेन्शमध्ये आले असतील. नेमका कोणत्या उमेदवाराला मराठे पाडणार त्यांना समजणार नाही. राजकारणामुळे मला जातीचं वाटोळं करायचं नसल्याचं जरांगेंनी सांगितलं. य म्हणाले मनोज जरांगे? मराठा समाजाला जिथे वाटेल की हा उमेदवार मराठा आणि कुणबी एकच आहेत हा कायदा पारित करण्यासाठी प्रयत्न करणार आहे. आमच्या ज्या काही चार ते पाच मागण्या आहेत त्या पूर्ण करण्यासाठी प्रयत्न करणार त्यालाच मराठ्यांनी मतदान करा. कार्यक्रम मात्र शंभरटक्के लावायचा कधीच न पडणारा पाडायचा, असं मनोज जरांगे पाटील म्हणाले. लोकांना आधी उमेदवार द्यावा लागतो मात्र आपलं उलटं आहे, आपल्याकडे आधी मत आहेत. मराठा आता हारून देऊ चालणार नाही. या राजकारणाच्या नावाखाली माझी जात राहता कामा नये. तिला मी मातीत मिसळू शकत नाहीत. मराठा समाजाने त्यांचा निर्णय घ्यायचाय. कोणालामही पाठिंबा नाही, लोकसभेमध्ये ज्यांना पाडायचं त्यांना पाडा असं जरांगे यांनी सांगितलं.जो आपल्या बाजूने उभा राहील त्याला मतदान करा, बाकीचे पाडून टाका. तुमच्या आमच्या हट्टापायी जात संपवायची नाही. भावनेचा आहारी जाऊन निवडणुका होत नाहीत. यांना धसकी होती म्हणून यांनी उमेदवार दिला नाही. उद्यापासून बघा कशा उमेदवारी देतात, आपल्या जातीमुळे हे फुल गॅसवर होते. शिक्का असा हनायचा, ते म्हणाले पाहिजे मराठ्यांच्या नादी लागायचे नाही. कोणालाही मतदान करा, पण तो सग्या सोयऱ्याच्या बाजूने असला पाहिजे. मी कोणालाही मतदान करणार नसल्याचं मनोज जरांगे म्हणाले.

# बीड लोकसभेसाठी गजु खामकर यांच्या नावाची जोरदार चर्चा

**दैनिक वादळ वार्तामा**
**जलगाव-प्रतिनिधी:-**

सर्व सामान्य कुटुंबातील एक उभरत युवा नेतृत्व, प्रबळ ओबीसी चेहरा, वंचित, उपेक्षित मराठा समाजासह मुस्लिम, बहुजन, बंजारा, वंजारी, धनगर, माळी समाजात असलेला दांडगा संपर्क तसेच मागील अनेक वर्षांपासून चळवळीत राहून सक्षमपणे काम करत जनसामान्या पर्यंत चांगली पकड ठेवत काम करणारे गजू खामकर यांची आगामी बीड लोकसभा निवडणुकीत प्रबळ उमेदवार असणार असल्याची जोरदार चर्चा रंगू लागल्याने सत्ताधारी पक्षातील लोकांच्या पायाखालची वाळू सरकू लागली आहे. आगामी २०२४ लोकसभा निवडणुकीचे बिगुल वाजले असून सर्वच राष्ट्रीय पक्षांची उमेदवारासाठी धडपड सुरू झालेली असून महायुती च्या वतीने विद्यमान पंकजाताई मुंडे यांची उमेदवारी निश्चित केलेली आहे .व बाकी पक्षाची संभाव्य उमेदवारांची चाचपणी केली गेली त्यानुसार बीड लोकसभा मतदारसंघातून सध्या गजू खामकर यांच्या नावाची जोरदार चर्चा होत आहे. व्यवसायाने शेतकरी पुत्रअसलेने व नागडगावचे माजी सरपंच व पंचक्रोशी मध्ये त्यांचा दांडगा संपर्क आहे गजू खामकर हे धनगर ओबीसी नेते आहेत त्यामुळे ग्रामीण भागात व शहरी पातळीवरील धनगर समाजाच सक्षम युवा नेतृत्व, प्रबळ ओबीसी चेहरा, वंचित, उपेक्षित सर्वसामान्यांच्या हाकेला धावून जाणारा चेहरा आणि मराठा समाजासह मुस्लिम,बहुजन,वंजारी, धनगर, माळी समाजात असलेला दांडगा संपर्क तसेच मागील अनेक वर्षांपासून चळवळीतील कार्यकर्ता म्हणून धनगर समाजाच्या एक गठ्ठा २ ते 3 लाख मतावर असलेली त्यांची पकड या त्यांच्या जमेच्या बाजू असून सध्या ओबीसी नेत्याची बीडची.जबाबदारी त्यांच्या कडे आहे बीड लोकसभेचे भावी खासदार म्हणून तुमच्याकडे पाहिले जात आहे

# भाजपला ओळखायला रोहित पवारांना अजून; अजित पवार गटातील नेत्याचा टोला

**वादळवार्ता/कर्जत**

राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे कर्जत जामखेडचे आमदार रोहित पवार सातत्याने भाजपवर टीका करताना दिसतात. वेगवेगळ्या मुद्द्यांवरून ते महायुतीला घेरण्याचा प्रयत्न करतात. त्यांच्या या टीकेला राष्ट्रवादी अजित पवार गटाचे नेते, मंत्री अनिल पाटील यांनी उत्तर दिलं आहे. भारतीय जनता पार्टीला ओळखायला रोहित पवार यांना अजून किमान 35 वर्षे लागतील. भारतीय जनता पार्टीचा माणूस तर भाजपला उमेदवाराला सोडणारच नाही. पण भाजपाला मानणारा महायुतीला सोडणार नाही. हा सुद्धा अनुभव रोहित पवार यांना या निवडणुकीत आल्याशिवाय राहणार नाही, असं अनिल पाटील म्हणाले.शिवतारेंच्या भूमिकेवर पाटील म्हणाले...

शिवसेना शिंदे गटाचे नेते विजय शिवतारे यांनी अजित पवार यांच्या विरोधात आक्रमक भूमिका घेतली होती. बारामतीतून लोकसभा निवडणूक लढण्याची त्यांनी घोषणा केली होती. आता मात्र त्यांनी माघार घेतली आहे. त्यावर अनिल पाटील यांनी प्रतिक्रिया दिली आहे. देवेंद्र फडणवीस असतील, एकनाथ शिंदे असतील, महायुतीचे जे जे नेते असतील त्यांचे मी आभार मानतो. कारण कुठेना कुठे आमच्या नेत्याचा मान सन्मान झाला आहे. विजय शिवतारेसाहेब यांच्याकडून चुकीची वक्तव्य केली जात होती, असं अनिल पाटील




म्हणाले.विजय शिवतारे हे वारंवार काही वक्तव्य करत होते. त्यांच्या वक्तव्याने दुःख आम्हाला सातत्याने होत होतं. यावर पडदा टाकण्यासाठी महायुतीच्या लोकांनी जे जाणीवपूर्वक प्रयत्न केले. त्या महायुतीच्या सर्व नेत्यांचं तसेच शिवतारे यांचे मी मनापासून आभार मानतो. गुण्या गोविंदाने सर्वांनी महायुतीच्या उमेदवाराचा प्रचार करावा. असं सर्वांना आवाहन करतो, असं अनिल पाटील म्हणाले.भुजबळांना उमेदवारी मिळणार?महायुतीकडून छगन भुजबळ यांना उमेदवारी मिळण्याची दाट शक्यता आहे. त्यावर अनिल पाटील यांनी प्रतिक्रिया दिली आहे. भुजबळसाहेब काय बोलले मला माहित नाही. जळगाव, धुळे नाहीतर किमान नाशिकची जागा आम्हाला मिळावी, यासाठी आम्ही आग्रही आहोत. यामुळे उत्तर महाराष्ट्रात एक तरी जागा मिळाल्याचा आम्हाला समाधान असू शकतो. पक्षाने आणि महायुतीने जर त्यांना जबाबदारी दिली तर त्यांनी निवडणूक लढू शकतात. शिवसेना शिंदे गट सुद्धा या जागेवर आकडे असेल तर प्रत्येक पक्षाचां तो अधिकार असतो. भाजपचाही या जागेवर आग्रह आहे तर राष्ट्रवादी काँग्रेसची या ठिकाणचे ताकद बघून राष्ट्रवादी काँग्रेसचा सुद्धा या ठिकाणी आग्रह आहे,

दैनिक
महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे एकमेव दैनिक
# वादळ वार्ता

# दिल्लीत काय घडलं?, नाशिकचं काय होणार? छगन भुजबळ यांचा सर्वात मोठा गौप्यस्फोट


**दैनिक वादळ वार्ता**

राष्ट्रवादीचे नेते आणि मंत्री छगन भुजबळ हे नाशिकमधून लढणार असल्याची चिन्हे आहेत. नाशिकच्या जागेसाठी शिंदे गट आणि राष्ट्रवादीत जोरदार रस्सीखेच सुरू आहे. एवढेच नव्हेतर याबाबत छगन भुजबळ यांनी एक मोठा गौप्यस्फोट केला आहे. मला माहिती नसताना नाशिकसाठी दिल्लीतूनच माझ्या नावाचा प्रस्ताव आला आहे, असा गौप्यस्फोट छगन भुजबळ यांनी केला आहे. तसेच तिकीट मिळालं तर आपण नाशिकमधून लढायला तयार असल्याचंही छगन भुजबळ यांनी म्हटलं आहे. त्यामुळे नाशिक मतदारसंघ कुणाकडे जाणार? याकडे सर्वांचं लक्ष लागलं आहे.

छगन भुजबळ यांनी मीडियाशी संवाद साधला. यावेळी त्यांनी नाशिकच्या जागेबाबतचे मोठे खुलासे केले. मी तिकीटासाठी आग्रही नव्हतो हे मी मागेही सांगितलंय. दिल्लीत जी चर्चा झाली, त्यात महाराष्ट्राबाबत माझ्या नावाची चर्चा झाली. या चर्चेत माझं नाव पुढे आले. माझं नाव लोकसभेसाठी पुढे येईल, याची मला कल्पनाही नव्हती. होळीसाठी निघालो होतो तेव्हा अर्ध्या वाट्यातून मुंबईला गेलो. वरिष्ठ पातळीवरून ठरलंय असं मला सांगितलं गेलं. मीही त्यांना मला एक दिवस द्या असं म्हटलं, असं छगन भुजबळ म्हणाले.

अन् नाशिकमध्ये चर्चा सुरू झाली

त्यानंतर मी अजित पवार यांच्याशी चर्चा केली. माझ्या नावाची चर्चा सुरु आहे हे खरं आहे का? असं त्यांना विचारलं. त्यावर, तुम्हाला उभं राहवं लागले. आम्ही चाचपणी केली, असं अजितदादा म्हणाले. उभं राहायचं असेल तर आधी तयारी करतात. पण ही गोष्ट बाहेर गेली आणि नाशिकमध्ये चर्चा रंगली, असं भुजबळांनी सांगितलं. घड्याळावरच लढू नाशिकमधून लढण्यासाठी शिंदे गटाचे खासदार हेमंत गोडसे यांनी आग्रह धरला आहे. पण महायुतीचे नेते जो निर्णय देतील तो मला मान्य आहे. महायुतीसाठी आम्ही एकत्र काम करू. जागा राष्ट्रवादीला सुटली तर आम्ही घड्याळावरच लढू. मी लढणार असल्याची बॅनर्स गावागावात लागली आहे. मला त्याची माहिती मिळाली, अशी माहितीही त्यांनी दिली. मराठा आरक्षणाला विरोध नाही यावेळी त्यांनी मराठा आरक्षणावरही प्रतिक्रिया व्यक्त केली. मी मराठा समाजाला कधीच विरोध केला नाही. नेहमीच पाठिंबा दिला आहे. नारायण राणे आणि देवेंद्र फडणवीस यांनी मराठा आरक्षणासाठी पावलं उचलली. मी त्यांना पाठिंबा दिला. फक्त ओबीसीतून आरक्षण देऊ नका. त्यांना स्वतंत्र आरक्षण द्या, एवढंच मी म्हणालो. बरं



हे काही मी एकटा म्हणालो नव्हतो. सर्वच पक्षाच्या नेत्यांची हिच भूमिका होती. मी आरक्षणाला विरोध केला नाही, असंही ते म्हणाले. निवडणूक निवडणुकीच्या पद्धतीने होऊ द्यावी हेच माझं मराठा नेत्यांना सांगणं आहे, असंही ते म्हणाले.

# निलेश लंकेच्या टीकेला आम्ही मीडियातून नाही तर:; सुजय विखे नेमकं काय म्हणाले?

**वादळवार्ता/माजलगाव**

निलेश लंके यांनी आमदारकीचा राजीनामा दिला. तसंच त्यांनी पुन्हा एकदा राष्ट्रवादी शरद पवार गटात जाणं पसंत केलं आहे. निलेश लंके यांनी आपल्या आमदारकीचा राजीनामा देताना सभा घेतली. या सभेत बोलताना त्यांनी सुजय विखे यांच्यावर टीका केली. विखेंनी आपल्याला आणि आपल्या कार्यकर्त्यांना त्रास दिला. आमच्या विकास कामात विखेंनी नेहमी अडथळा आणला, असं लंके म्हणाले. त्यांच्या या वक्तव्याबाबत सुजय यांना विचारण्यात आलं. तेव्हा लंकेंनी राजीनामा का दिला. तो त्यांचा व्यक्तिगत प्रश्न आहे. त्यावर मी भाष्य करणार नाही. त्यांनी सभेदरम्यान जे आरोप केले. त्याचं उत्तर मीडियाच्या माध्यमातून नाही तर सभेतून उत्तर देऊ...आमचे कार्यकर्ते त्याला



उत्तर देतील, असं सुजय विखे म्हणाले. लंकेच्या उमेदवारीवर सुजय विखे म्हणाले...निलेश लंके यांची उमेदवारी जवळपास निश्चित झाली आहे. त्यामुळे लंकेशी लढत असल्याने काही आव्हान वाटतं का? असा प्रश्न विचारण्यात आला. तेव्हा समोरून कुणीही उमेदवार असला तरी मी माझी रणनीती बदलत नाही. मी माझ्या कामाच्या आधारावर जनतेसमोर जाणार आहे. मी कधीही कुणाला कमी लेखात नाही.

# शरद पवार गटाकडून आचारसंहिता भंगाची तक्रार, शिंदे गट आणि भाजप गोत्यात?

**दैनिक वादळ वार्ता**
**माजलगाव / प्रतिनिधी**

लोकसभा निवडणुकीची रणधुमाळी सुरू झाली आहे. या पार्श्वभूमीवर राजकीय पक्षांकडून एकमेकांची उणीदुणी काढली जात आहे. आयाराम गयारामांचीही चलती सुरु झाली आहे. या सर्व धामधुमीत शरद पवार गटाने शिंदे गट आणि भाजपवर आदर्श आचारसंहितेचा भंग केल्याचा आरोप केला आहे. स्टार प्रचारकांच्या यादीत आपल्याच पक्षाच्या नेत्यांची नावे दिली जातात. दुसऱ्या पक्षाची नावे दिली जात नाही. शिंदे गट आणि भाजपने आपल्या यादीत एकमेकांच्या पक्षातील नेत्यांचा समावेश केला आहे. हा आदर्श आचरसंहितेचा भंग असून याप्रकरणी कारवाई केली गेली पाहिजे, अशी मागणी शरद पवार गटाचे नेते जितेंद्र आव्हाड यांनी केली आहे.



जितेंद्र आव्हाड यांनी पत्रकार परिषद घेऊन ही मागणी केली. कालपासून स्टार प्रचारकांची यादी येत आहे. आम्ही निवडणूक आयोगाकडे एक तक्रार केली आहे. एकनाथ शिंदे यांच्या यादीत दोन चुका आहेत. स्टार प्रचारकांच्या यादीत व्यक्तीच्या नावापुढे त्यांचं पद लिहिलं जात नाही. तो नियमभंग ठरतो. पण शिंदे गटाच्या यादीत नरेंद्र मोदी, अमित शाह, एकनाथ शिंदे, नितीन गडकरी, रामदास आठवले, देवेंद्र फडणवीस आणि अजित पवार यांच्या नावापुढे पदं लिहिण्यात आली आहेत. हे चुकीचं आहे. आदर्श आचारसंहितेचा हा भंग आहे, असं जितेंद्र आव्हाड म्हणाले.

ती नावे टाकू शकत नाही

भाजपने त्यांच्या यादीत 12 आणि 13व्या नंबरवर एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांचं नाव नमूद केलंय. सेक्शन 77 नुसार यादीत कुणाचं नाव घेऊ शकता आणि कुणाचं नाही हे यात नमूद केलं आहे. अशा प्रकारे नाव घेतली असेल तर निवडणुका होईपर्यंत त्यांच्यावर बंदी घालण्याचा आयोगाला अधिकार आहे. तसा कायदा आहे. आपल्या पक्षाच्या यादीत दुसऱ्या पक्षाच्या नेत्यांची नावे घेऊ शकत नाही. भाजप आणि शिंदे गटाने जी नावे टाकली तो निवडणूक आयोगाचा भंग आहे, असं आव्हाड यांनी सांगितलं.

# प्रकाश आंबेडकर यांचे बंधू अमरावतीतून निवडणूक लढणार; नवनीत राणा यांच्यासमोर कडवे आव्हान?

**वादळवार्ता/अमरावती**

पश्चिम विदर्भातील पाच जिल्ह्यांत लोकसभेचा बिगुल वाजला आहे. काही जागांचा तिढा अजून सुटलेला नाही. पण सध्या सर्वाधिक चर्चा सुरु आहे ती अमरावती लोकसभा मतदारसंघाची. अनेकांचा विरोध डावलून भारतीय जनता पक्षाने नवनीत राणा यांच्या नावावर शिक्कामोर्तब केले आहे. पण या विजयासाठी मोठी आव्हानं त्यांच्यासमोर दिसत आहेत. बच्चू कडू यांनी त्यांची नाराजी व्यक्त केली आहे. तर आता प्रकाश आंबेडकर यांचे



बंधू आणि रिपब्लिकन सेनेचे प्रमुख यांनी पण अमरावती मतदारसंघावर दावा ठोकला आहे. त्यामुळे येथील निवडणूक चुरशीची होणार अशीच चिन्हं आहेत.2 एप्रिल रोजी अर्ज भरणारआपण स्वतः अमरावती लोकसभा मतदार संघातून उमेदवारी अर्ज भरणार असल्याची माहिती आनंदराज आंबेडकर यांनी दिली आहे. 2 एप्रिल रोजी ते उमेदवारी अर्ज दाखल करतील. या मतदारसंघात अनेक प्रश्न आहेत, त्याकडे स्थानिक लोकप्रतिनिधीचं लक्ष नसल्याचा टोला त्यांनी हाणला. अमरावती हा विदर्भातील सर्वात महत्वाचा जिल्हा आहे. पण त्याचा विकास रखडला आहे. त्यामुळेच आपण लोकसभेच्या रिंगणात उतरणार असल्याचा दावा त्यांनी केला.

# लातूरमध्ये मोठा राजकीय भूकंप; काँग्रेसमधील आणखी एक मोठं कुटुंब भाजपमध्ये

**वादळवार्ता/लातूर**

ऐन लोकसभा निवडणुकीत काँग्रेसला प्रचंड मोठा धक्का बसला आहे. काँग्रेसचे बडे नेते शिवराज चाकूरकर यांच्या सून अर्चना पाटील यांनी भाजपमध्ये प्रवेश केला आहे. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्या उपस्थित अर्चना पाटील यांनी भाजपमध्ये प्रवेश केला आहे. त्यामुळे काँग्रेससाठी हा मोठा झटका मानला जात आहे. तर, निवडणूक काळात भाजप अधिक मजबुतीने उभा राहताना दिसत आहे. अर्चना पाटील यांच्या प्रवेशाने भाजप लातूरमध्ये बळकट झाली आहे.भाजप कार्यालयात उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्या उपस्थितीत हा प्रवेश सोहळा पार पडला. यावेळी काँग्रेसचे बडे नेते शिवराज पाटील चाकूरकर यांच्या सून अर्चना पाटील आणि उदगीरचे 7 वेळा नगराध्यक्ष असलेले राजेश नितुरे यांनी भाजपमध्ये प्रवेश केला. काँग्रेसमधील एक मोठं कुटुंब आणि मराठवाड्यातील मोठ्या नेत्याची सून भाजपमध्ये आल्याने मराठवाड्यात भाजप अधिक बळकट होण्यास मजबूत होणार आहे. म्हणून निर्णय घेतला अर्चना पाटील चाकूरकर यांनी भाजपमध्ये येण्याबाबतचं कारण जाहीर केलं. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी गेल्या दहा वर्षात अनेक मोठी कामे केली आहेत. विकासाच्या कामाने देशाची प्रगती झाली आहे. मोदींनी महिलांसाठी नारी शक्ती वंदन बिल आणलं. त्यामुळे राजकारणात येण्यापासून घाबरणाऱ्या महिलांना आता राजकारणात येण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. मोदी यांच्या या निर्णयाने प्रभावित होऊनच मी भाजपमध्ये येण्याचा निर्णय घेतला आहे. मी सोनिया गांधी आणि सुषमा स्वराज सारख्या नेत्यांना जवळून पाहिलं आहे. त्यांचं काम पाहिलं आहे. त्यांचा माझ्यावर मोठा प्रभाव पडला आहे, असं सांगतानाच तुमचे आशीर्वाद माझ्या पाठी राहू द्या, असं अर्चना पाटील म्हणाल्या. शिवराज पाटील यांचं कौतुक यावेळी देवेंद्र फडणवीस यांनी मीडियाशी संवाद साधला. फडणवीस यांनी आपल्या भाषणात शिवराज पाटील चाकूरकर यांची वरेमाप स्तुती केल्याने आश्चर्य व्यक्त केलं जात आहे. शिवराज पाटील यांनी मूल्यावर आधारीत राजकारण केलं आहे. त्यांनी अत्यंत चांगलं काम केलं.



दैनिक वादळ वार्ता हे पत्र मुद्रक ग्राफिक्स डी. टी. पी.डिजाईनर अंगद दराडे मो.8668682620 घळाटवाडी माजलगाव बीड 431131 जय श्री राम प्रेस येथून डिजिटल छापून संपादक तथा मालक वितरक अजय भांगे मो. 94226 60077 केज येथून त्यांच्या ऑफिस वरून बीड तसेच सर्वत्र महाराष्ट्र भर डिजिटल स्वरूपात प्रकाशित केले आहे ( वाद केज / बीड न्यायालय अंतर्गत )